
REVIEW OF LITERATURE

ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 2.0260(UIF)
VOLUME - 4 | ISSUE - 6 | JANUARY – 2017

# महात्मा गांधी यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन

**प्रा. बालाजी गंगावणे**
**विभाग प्रमुख, इतिहास , माऊली महाविद्यालय, वडाळा,**
**ता. उ. सोलापूर जि. सोलापूर.**




## प्रास्ताविक -

म.गांधी यांचे विविध विषयांवरील विचार केवळ भारतालाच नाही तर संपुर्ण जगाला आजही मार्गदर्शक आहेत. म.गांधी यांच्या समग्र विचारामध्ये भारताचा भुतकाळ, तत्कालीन वर्तमान काळ आणि उज्वल भविष्यकाळाचे प्रतिबिंब पाहवयास सापडते. म.गांधी यांच्या विचाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे विचार सकारात्मक, आशावादी व पुनर्रचनावादी आहेत म. गांधीच्या काळात मार्क्सवादाचा प्रभाव जगभर पडत असताना या विचारांवर कठोर टिका न करता त्यातील दोष किंवा त्रुटी म.गांधी यांनी दाखवुन दिल्या. म. गांधीच्या विचारामध्ये आत्मबळ, अहिंसा, आत्मत्याग, विवेक, स्वाभिमान, सामंजस्य, स्वराज्य, सभ्यता या घटकांना अनन्य साधारण स्वरुपाचे महत्त्व आहे. या सर्वामध्ये नितीच्या पालनाला त्यांनी विशेष महत्व दिले आहे.

जनतेचे स्वराज्य, जगाचे कल्याण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यासाठी म. गांधीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वपुर्ण आहे हा दृष्टिकोन स्पष्ट करताना वर्तमानकाळातील शिक्षणाचे महत्त्व, उणिवा आणि उपाययोजना यासाठी म.गांधीचे विचार कसे पथदर्शक, सम्यक आहेत हे या प्रस्तुत शोधनिबंधात सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोध निबंधात तथ्यांचा संशोधनासाठी मी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केला आहे.

## म. गांधी यांच्या शिक्षण विषयक दृष्टिकोन -

स्वातंत्र्य, स्वराज्य आणि राष्ट्र यांना नजरे समोर ठेऊन म. गांधीनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले आहेत हे विचार मांडताना भारत हा खेड्यांचा देश आहे हे चित्र (वास्तव) म.गांधीच्या डोळ्यासमोर आहे. म. गांधी यांनी शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. जे मुक्ती योग्य बनविते ते शिक्षण म्हणजे जे चित्ताची शुध्दी करुन शकत नाही मन व इंद्रियांना वश करण्यास शिकवु शकत नाही , स्वातंत्र्यात राहण्याची अभिलाषा निर्माण करु शकत नाही. गुलामगिरीतून मुक्तता करुन शकत नाही त्या शिक्षणात ज्ञानाचे कितीही भांडार असेल, उच्च भाषा असेल तरीही ते शिक्षण ख-या अर्थाने शिक्षण ठरत नाही.

म्हणजेच म.गांधीच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनातून संयम, चित्ताची शुध्दता, मनावरील नियंत्रण, स्वातंत्र्य या घटकांना विशष महत्त्व आहे या मुलभुत तत्त्वावरुन शिक्षण विषयक विचारांचे विश्लेषण म. गांधी यांनी केले आहे. गुलामगिरीचा संदर्भ तत्कालीन परिस्थितीत असला तरी आधुनिक काळाला देखील विशेषत: मानसिक गुलामकिरी संदर्भात लागु पडतो. म.गांधी यांनी शिक्षण विषयक विचारांचे विश्लेषण करताना पुढील घटकांचा विचार केलेला आहे. त्यांचा स्वतंत्र आणि ठळकपणे विचार आपण करणार आहोत.

**१) परिश्रमाभिमुख शिक्षण -** म. गांधी यांच्या मते भारत हा खेड्यांचा व कृषिप्रधान देश आहे भारतातील ८० टक्के लोक शेती व शेतीशी संबंधित व्यवसाय करतात. (संदर्भ - माझ्या स्वप्नांचा भारत लेखक म. गांधी - पानं नं ७१)

अशा देशात शब्द पंडीत निर्माण करणारे आणि जनतेला परिश्रम विमुख बनविणारे शिक्षण देणे हा गुन्हा ठरेल परिश्रमा बद्दल तिरस्कार निर्माण करणारे शिक्षण देणे अयोग्य ठरले.

**२) सक्तीचे मोफत शिक्षण -** म. गांधी यांनी सक्तीचे आणि मोफत शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे अशा शिक्षणाचा उद्देश पुर्ण होण्यासाठी मुलांतील शारिरिक, मानसिक आणि माध्यमिक सुप्त शक्ती विकसित होईल असा उपयोगी उद्योग आम्ही त्यांना शिकवावा म्हणजेच खेड्यांचा उध्दार होईल. समाजरचनेचा पाया मजबुत होईल. श्रीमंत, गरीब व अन्य भेद राहणार नाही.

**३) सर्वांगीण विकासाचे शिक्षण -** म. गांधी यांच्या मते, हात, पाय, डोळे, कान, नाक, डोके यांचा योग्य अभ्यास करुन त्यांच्या सदउपयोगाचे शिक्षण देऊनच बुध्दीचा खरा विकास होऊ शकेल. बालकांच्या बुध्दि विकासाचा हा शिघ्रतम मार्ग आहे. अशा प्रकारे शरीर आणि मेंदू यांची समन्वयात्मक प्रगती आणि त्या बरोबरच अध्यामिक प्रगती होणे गरजेचे आहे केवळ बुध्दीच्या विकासाने फार काही साध्य होणार नाही.

**४) हस्त व्यवसाय -** म.गांधी यांच्या मते अक्षर ओळखण्यापूर्वीय विविध अवजारांची ओळख होण आवश्यक आहे बाजारात विकल्या जातील अशा वस्तु बनविण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. तसेच या कामापासून मुलांना आनंद प्राप्त व्हावा हस्त व्यवसाय प्रधान शिक्षण सुरु केल्याने दोन उद्दिष्ट्ये साध्य होतील एकतर मुलांच्या शिक्षणाचा खर्च निघेले व त्यांना भावी जिवनात उपजिविका प्रश्न सोडविण्यास मदत होईल आमची मुले स्वावलंबी बनतील.

**५) उच्च शिक्षण -** राष्ट्रीय आवश्यकतांची पुर्तता करण्यासाठी उच्च शिक्षण महत्त्वाचे आहे. विविध उद्योग आणि उद्योग समुहांनी त्यांना आवश्यक असणारे तंत्रज्ञ आणि अभियंते यांना यांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी विविध उद्योगांसाठी आवश्यक असणारे कॉलेजेस निर्माण करावे लागतील. ही महाविद्यालये स्वावलंबी असावीत अशा विद्यार्थ्यांना स्थानिक ठिकाणी रोजगार मिळण्यास मदत होईल. यासाठी औद्योगिक शिक्षण अनिवार्य करावे लागेल.

**६) स्त्री शिक्षण -** स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत म. गांधी यांच्या दृष्टिकोन समाज स्वरुपाचा आहे त्यांच्या मते पुरुषांच्या बाबतीत सुविधेचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच ते स्त्रियांच्या बाबतीत देखील आहे स्त्रियांना शिक्षणासाठी जेथे विशेष सवलतीची गरज वाटेल तेथे त्या मिळाव्यात.

**७) प्रौढ शिक्षण -** म. गांधी यांच्या मते निरक्षरता हा भारतावरील फार मोठा कलंक आहे आणि तो नष्ट झाला पाहिजे अक्षर ओळख म्हणजे प्रौढ शिक्षण कसे नव्हे तर उपयुक्त ज्ञानांवर आधारित व दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असेच शिक्षण त्यांना घ्यायला हवे असे शिक्षण जनतेवर लादु नये तर त्यांच्या प्राप्तीची भुक त्यांना लागावी त्यांच्या गावाशी संबंधित गणित, भुगोल, इतिहास, साहित्य इ. चे त्यांना ज्ञान द्यावे दैनंदिन उपयोगाचे व्यावहारिक ज्ञान प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून दिले जावे.

**८) विश्व विद्यालये -** म. गांधी यांच्या मते विश्व विद्यालयांनी केवळ परिक्षेचे काम करावे विश्वविद्यालये आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असावीत विद्यार्थ्याच्या प्रवेश फी वर त्यांनी स्वताःचा खर्च चालवावा त्यांच्याकडे निरीक्षणाची व अभ्यासक्रम मंजुर करण्याची जबाबदारी राहिल विश्व विद्यालयाकरीत पैसा गोळा करण्याचे काम राज्याचे नसेल तर समाजाचे राहिल म्हणजेच जनतेचे राहिल. म. गांधी यांच्या मते जनतेच्या इच्छेमुळे क्रांती अस्तित्वात येते तेंव्हा स्वरुप व्यापक आणि टिकावू असते.

**९) अखंड विद्यार्जन -** म. गांधी यांच्या मते शाळा संपली तरी शिक्षण संपत नसते तर खरे शिक्षण नंतरच सुरु होते कर्तव्याचे पालन करता स्वतःच्या ज्ञानात भर टाकावी प्रत्येक गोष्ट जाणिवेने केली तर त्याचे ज्ञान वाढेल. व्यक्ति स्वताच स्वताचा खरा शिक्षक आहे अनुभव ही फार मोठी शाळा आहे. ज्ञानार्जनाला अनुकुल वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. म. गांधी यांचया मते शाळांत शिकणे अशक्य आहे. असे अनेक उद्योग आहेत.

**१०) शिक्षणाचे माध्यम -** शिक्षणाचे प्रभावी माध्यम मातृभाषा हेच आहे. धार्मिक बाबतीत संस्कृत भाषेचा आग्रह म. गांधी यांनी धरला आहे. शिक्षणात योग्य संस्कृती संवर्धक व कौटुंबिक स्तरावरचे संबंध निर्माण करण्यासाठी मातृभोषेला पर्याय नाही असे म. गांधी यांचे मत होते. इंग्रजी भाषा लादणारे आमच्या शत्रु प्रमाणे असतील असे म. गांधी म्हणतात. इंग्रजी भाषेशिवाय आपले काही चालणार नाही असे म्हणणे ते आमच्या गुलामी वृत्तीचे व अधःपाताचे द्योतक आहे असे म. गांधी मानतात.

**समारोप -**

म. गांधी यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन अत्यंत स्पष्ट, मुलगावी आणि व्यापक स्वरुपाचा आहे. म. गांधीच्या शिक्षण विषयक विचारावर समकालीन असणा-या जॉन स्ट्रअर्ट मील च्या विचारांचा प्रभव जाणवतो. म. गांधीचे शिक्षण विषयक विचारातील काही विचार प्रत्यक्षात आणणे कठीण असले तरी अनेक संदर्भातील विचार मौलिक स्वरुपाचे आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेकडे पाहण्याचा म. गांधीचा दृष्टिकोन अत्यंत सक्षम आहे.

म. गांधीच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनाला धार्मिक नितीतत्त्वांचा आधार आहे म्हणूनच तर त्यांनी धर्म शिक्षणाचाही आग्रह धरलेला दिसून येतो. पैशाची (मोबदल्याची) पर्वा नसणारे आणि देशभक्तीने प्रेरित असणारे शिक्षक हवे आहेत असे म. गांधी म्हणतात.

## निष्कर्ष -

१) म. गांधी यांचे शिक्षण विषयक विचार तत्कालीन परिस्थितीतील असले तरी आधुनिक भारतीय समाजात ते उपयुक्त आहेत.
२) आधुनिक समाजातील शिक्षण विषयक समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार प्रेरणादायी ठरतील.
३) उच्चा शिक्षणाबाबत/ उच्च शिक्षणांच्या प्रक्रियेबाबत महात्मा गांधीचे विचार भांडवल शाहीला पोषक असणारे वाटतात.
४) शिक्षणात स्वभाषेचा आग्रह महत्त्वपूर्ण असला तरी वर्तमान समाजात इंग्रजी विषयाचे महत्त्व नाकारता येणार नाही.

## संदर्भ सुची

१) माझ्या स्वप्नांचा भारत -महात्मा गांधी
२) भारतीय राजकीय विचारवंत, कृ.दि. बोराळकर
३) आर्थिक विचारवंताचा इतिहास, प्रा. ए.आर. रायखेलकर
४) लोकराज्य अंक ऑक्टोबर २०१०